# शताब्दी महोत्सव सांगता समारंभ



अभिनयाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळविणाऱ्या विक्रम गोखलेंचा (मधे) सत्कार आशुतोष गोवारीकर व किरण शांताराम



सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे राष्ट्रीय पारितोषिक मिळविणाऱ्या उषा जाधव (धग) यांच्या सत्कार करतांना किरण शांताराम व झी टीव्हीचे उदय निरगुडकर

# भारतीय चित्रपट-शताब्दी

# ‘प्रभात’चा आगळा वेगळा चित्रपट महोत्सव’

● नीला उपाध्ये

**भारतीय** चित्रपटांची शताब्दी हा तसा प्रत्येक चित्रपटप्रेमीसाठी अभिमानाचाच विषय! त्यातही मराठी प्रेक्षकांसाठी तर तो खासच अभिमानाचा विषय असला पाहिजे. कारण या चित्रपट सृष्टीचा जनक दादासाहेब फाळके हा एक मराठी माणूस होता! दि. ३ मे १९१३ रोजी त्यांचा ‘राजा हरिश्चंद्र’ हा पहिला चित्रपट प्रदर्शित झाला आणि ल्युमिए बंधूंनी फ्रान्समध्ये केलेला रुपेरी पडद्यावरचा चमत्कार भारतातही आला, याचा आपण मराठी रसिकांनी विशेष अभिमान बाळगायलाच हवा.

पण त्या अभिमानाच्या प्रमाणात हा शताब्दी सोहळा, त्या मानाने अनेकानेक उपक्रमांद्वारे आपल्याकडे साजरा होताना मात्र दिसला नाही. मुंबईत तरी राज्य सरकारचा मोठा पारितोषिक वितरण सोहळा २ मे रोजी रवींद्र नाट्य मंदिरात साजरा केला गेला आणि त्यानिमित्त भारतमाता सिनेमात २१ मराठीच व ७ हिंदी चित्रपटांचा महोत्सव झाला. तेवढेच!

खरे तर शंभर वर्षांनंतर, भारतीय चित्रपटसृष्टीत दरवर्षी हजाराहून अधिक चित्रपटांची निर्मिती विविध भाषांतून होत असते. जगातील सर्वाधिक चित्रपट-तिकिट विक्री केली जाणारा देश म्हणून भारतीय सिनेसृष्टीची जगात ओळख आहे. या उद्योगाची सध्याची आर्थिक उलाढाल वर्षाकाठी ११२-४ अब्ज डॉलरच्या पुढे आहे. याची दखल घेऊन विदेशी चित्रपटसृष्टीने निरनिराळे कार्यक्रम आयोजित केले आहे. जूनमध्ये होत असलेल्या मेलबर्न आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या पूर्व प्रसिद्धीसाठी मेच्या पहिल्या सप्ताहात करण्यात आलेल्या कार्यक्रमात बॉलिवुडचे सुपरस्टार अभिषेक बच्चन यांचा खास सत्कार करण्यात आला होता तर, आपल्या



**यावर्षीचा सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा राष्ट्रीय सन्मान मिळविणाऱ्या ‘इन्व्हेस्टमेंटचे’ दिग्दर्शक रत्नाकर मतकरींचा सन्मान करतांना किरण शांताराम**

विद्या बालनला ब्रँड ॲम्बॅसॅडर म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. मेलबर्न तसेच फ्रान्समधील कान्स चित्रपट महोत्सवांत शतकपूर्ती निमित्त विविध भारतीय भाषांतील निवडक चित्रपटांचे प्रदर्शन केले गेले. परदेशींच्या या उत्साहाच्या पार्श्वभूमीवर आपल्याकडील उदासीनता बोलतेच!

**'बॉम्बे टॉकिज'लाही...**

विशेष म्हणजे, या शतकपूर्तीनिमित्त झोया अख्तर, दिबाकर बॅनर्जी, अनुराग कश्यप व करण जोहर या चार तरुण, नामवंत दिग्दर्शकांनी भारतीय चित्रपट सृष्टीला सलामी देण्यासाठी गाजावाजा करीत तयार केलेल्या 'बॉम्बे टॉकिज'या सुंदर चित्रपटालाही प्रेक्षकांनी अपेक्षेइतका प्रतिसाद दिला नाहीच. आघाडीच्या कालाकारांना एकत्र आणून 'थीम साँग' तयार केलेला हा चित्रपट ३ मे रोजी मुद्दाम प्रदर्शित केला गेला, तेव्हा पहिल्या दिवशी या चित्रपटाने अवधी सव्वा ते दीड कोटी रुपयांची कमाई केली. पण त्याच दिवशी प्रदर्शित झालेल्या 'शूट आऊट ॲट वडाला'या चित्रपटाने मात्र पहिल्याच दिवशी दहा कोटींची कमाई करून, प्रदर्शित झाल्या झाल्या सर्वाधिक कमाई करणारा या वर्षीचा चित्रपट म्हणून स्वत:ची नोंद करून घेतली. या विरोधाभासाचा अर्थ-चित्रपटसृष्टीचा शताब्दीविषयी सर्वसामान्य प्रेक्षकाला काहीच घेणे देणे नाही. असाच काढावा लागतो ना? पण हाणामारी-गुन्हेगारी-आयटेम डान्सच बघायला आवडणाऱ्या पिटातल्या प्रेक्षकांनाच कशाला दोष द्यायचा? ऑस्करच्या निकालांविषयी उत्सुकता असलेल्या आमच्या उच्चभ्रू प्रेक्षकांपैकी कितीजणांना आपल्या भारतीय भाषांतील कुठल्या चित्रपटांना कलाकारांना आपले राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाले त्याविषयी उत्कंठा असते? प्रामाणिक उत्तर नकारार्थीच येते...

**राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट**

त्यामुळेच या महाराष्ट्रात चित्रपट-सुजाण आस्वाद-संस्कृती रुजवण्यासाठी गेली ४० वर्षे आस्वादशिबिरे, जागतिक चित्रपट महोत्सवाचे विविध उपक्रम राबविणारे प्रभात चित्र मंडळ शताब्दी निमित्त, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटांचा महोत्सव घेऊन आले, तेव्हा मनापासून आनंद झाला. दि. १४ मे ते १७ मे २०१३ पर्यंतच्या मुंबईतील पु. ल. देशपांडे कला अकादमीत आयोजिलेल्या महोत्सवात पुरस्कार विजेते नऊ चित्रपट आणि शताब्दी निमित्त घेतलेल्या लघुपट स्पर्धेतील निवडक लघुपट प्रभातने दाखवले (लघुपटांच्या स्पर्धेत बिजू इव्हनचा 'वन्स इच ट्वाईस ए डे' व मंगेश सातपुतेचा 'मुंबई एरर' हे लघुपट शांतश्री प्रतिष्ठान च्या पुरस्कारांचे विजेते ठरले!)

महोत्सवाचा उत्तरार्ध २० ते २२ मे रोजी रोज संध्याकाळी दक्षिण मुंबईतील चव्हाण सेंटरच्या रंगस्वर सभागृहात सात व्यक्तिचे चित्रपट दाखवून साजरा करण्यात आला. हा उत्तरार्ध अत्यंत हृद वाटला कारण, भारतीय चित्रपटसृष्टी बहरावी, यासाठी आपले अवघे आयुष्यच चित्रपट कलेच्या विविध पैलूंच्या उत्कर्षासाठी समर्पित केलेल्या, काही पडद्यावरच्या तर काही पडद्यामागच्या कलाकारांचे जीवनचरित्र व कलाकार प्रेक्षकांसमोर सादर करणारे हे माहितीपट होते. अर्थात या चत्रिपटांची रूजवात संयोजकांनी महोत्सवाच्या पूर्वार्धातच शिवेंद्रसिंग डुंगरपूर दिग्दिर्शित 'सेल्युलाईड मॅन' दाखवून केली होतीच!

**शशिकला-सचिन सन्मानित**

चित्रपट महोत्सवाचा उद्‌घाटन सोहळाही अत्यंत

हृदयस्पर्शी झाला. भारतीय चित्रपटसृष्टीला भरीव योगदान दिलेल्या अभिनेत्री शशिकला व यंदा चित्रपट कारकीर्दीची पन्नास वर्षे पूर्ण केलेले अभिनेते-निर्माते-दिग्दर्शक सचिन पिळगावकर यांनी प्रभात चित्रमंडळाचे अध्यक्ष किरण शांताराम यांच्यासह नंदादीप प्रज्वलित करून या महोत्सवाचे उद्‌घाटन केले. चित्रपटसृष्टीला दिलेल्या योगदानाबद्दल या दोन्ही कलाकारांचा अध्यक्षांनी सन्मानचिन्हे, शाल-श्रीफळ देऊन सत्कारही केला. मंडळाचे सरचिटणीस संतोष पाठारे यांनी प्रारंभी शशिकला यांच्या कारकीर्दीचा आढावा घेणारी ध्वनिचित्रफीत दाखविण्याचे औचित्य साधले. वयाची ऐंशी ओलांडली तरी आपला डौलदारपणा राखून ठेवलेल्या, वहिदा रेहमानप्रमाणेच आपल्या चंदेरी केसांचा मुकुट रुबाबात मिरवणाऱ्या शशिकलाबाई हा सत्कार स्वीकारताना भावुकच झाल्या. सत्काराला उत्तर देताना त्यांनी आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभाच्या खडतर संघर्षाच्या आठवणी ज़ागवल्या. 'घरची गरज म्हणून मिळतील त्या छोट्या छोट्या भूमिका करतानाच, याच किरणच्या वडलांनी व्ही. शांतारामबापूंनी माझे कलागुण हेरून त्यांच्या 'सुरूंग' या चित्रपटात प्रथमच मला महत्त्वाची भूमिका दिली. त्या कामामुळेच पुढे मला राज कपूर, अशोक कुमार, दिलीप कुमार, देव आनंद यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे या सत्काराचा आजचा दिवस माझ्यासाठी खूप आनंदाचा आहे. कारण या भारतीय चित्रपटसृष्टीने मला खूप काही दिले आहे. या चित्रपटसृष्टीमुळेच आणि रसिकांनी भरभरून केलेल्या प्रेमामुळेच मला नावलौकिक मिळाला. त्यामुळे चित्रपटसृष्टीला मी माझे कुटुंबच मानते.




असे त्यांनी आवर्जुन सांगितले.

**सचिन पिळगावकर**

प्रभात चित्र मंडळाच्या प्रारंभिक सदस्यांपैकी एक असलेल्या व तेथील चित्रपट बघतच स्वत:तील निर्मात्या-दिग्दर्शकाला घडवत गेलेल्या सचिनची भावावस्थाही तशीच होती. सत्काराला उत्तर देताना त्यांनी प्रथम अजूनही आपले सौंदर्य राखून ठेवलेल्या शशिकलाबाईंना मनमोकळी दाद दिली. ते म्हणाले, हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णयुगात आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या कलावंतामध्ये शशिकालाबाईंचे स्थान खूप वरचे आहे. भारतीय चित्रपटांची भाषा ही हिंदुस्थानी म्हणजे हिंदी-उर्दू-मिश्रित अशी भाषा आहे. या हिंदुस्थानी भाषेवर शशिकलाचे प्रभुत्व होते. एक कलावंत म्हणून मला त्यांच्याकडून खूप शिकायला मिळाले. तुम्हा सर्वांच्या सदिच्छांमुळे दि. २३ मे १९६३ रोजी 'हा माझा मार्ग एकला'या चित्रपटापासून सुरू झालेल्या माझ्या कलाप्रवासाला यंदा २३ मे रोजी पन्नास वर्षे होत आहेत. म्हणूनच हा योग साधून या सुवर्णमहोत्सवाबद्दलची कृतज्ञता

मी तुम्हाला 'एकुलती एक'हा माझा नवा चित्रपट सादर करून व्यक्त करीत आहे. या चित्रपटातून आमची कन्या श्रेया तिची चित्रपट कारकीर्द सुरू करीत आहे.

कृपया मला जसं प्रेम दिलंतं, तसंच माझ्या श्रेयालाही द्या!

### 'इन्व्हेस्टमेंट'ने शुभारंभ

साठाव्या राष्ट्रीय चित्रपट पारितोषिकांत सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट म्हणून विजेता ठरलेल्या रत्नाकर मतकरी लिखित दिग्दर्शीत 'इन्व्हेस्टमेंट' या चित्रपटाने प्रभातच्या या चित्रपट महोत्सवाचा शुभारंभ झाला. नाटके-कथालेखन आयुष्यभर करतानाच एक तरी चित्रपट दिग्दर्शित करायचाच ही मतकरींची खूप जुनी आस अखेर वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी दिग्दर्शिलेल्या 'इन्व्हेस्टमेंट'या चित्रपटाने पूर्ण केली. इतकेच नव्हे तर त्या पहिल्याच चित्रपटाने त्यांना राष्ट्रीय पुरस्कारही मिळवून दिला. त्याबद्दल त्यांचाही किरण शांताराम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मतकरी म्हणाले, सिनेमाचे जे ठरावीक ग्लॅमर असते, त्याचा आधार न घेता, उच्चभ्रू नव श्रीमंतांत जी वाढती संवेदनाशून्यता आडळते, तो आशय लोकांपर्यंत पोहोचवण्याचा जो आमचा प्रामाणिक प्रयत्न होता, त्याला मिळालेली दाद म्हणजे हा राष्ट्रीय पुरस्कार आहे. हा चित्रपट करताना व्यावसायिक यश मिळावे, म्हणून कोणत्याही प्रकारची तडजोड आम्ही केली नव्हती. चित्रपटाशी लोकांचे जोडले जाणे आणि चित्रपटाने प्रेक्षकांना पकडून ठेवणे या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात आणि 'इन्व्हेस्टमेंट'मध्ये त्या उत्तम रित्या साध्य झाल्या. माझी कन्या सुप्रिया विनोद-तुषार दळवी, सुलभा देशपांडे यांच्यापासून बालकलाकार प्रहर्ष नाईक पर्यंत सर्वच कलाकारांचे



**प्रभात चित्र मंडळातर्फे महोत्सवातील लघुपट स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार कण्यात आला डावीकडून बिजू इव्हनस (वन्स ट्वाईस अ डे) मंगेश सातुपते (मुंबई एरर) विक्रांत पवार (कातळ) उषा जाधव (धग) संतोष पाठारे, सेक्रेटरी**

उत्कृष्ट अभिनय, सिनेमॅटोग्राफर अमोल गोळेपासून सर्वच तंत्रज्ञांची चोख कामगिरी-या साऱ्यांच्या 'टीम वर्क'चे हे यश आहे.

मतकरींनी आत्मविश्वासाने काढलेले हे उद्गार अनाठायी नव्हते, याचा प्रत्यय 'इन्व्हेस्टमेंट' बघताना आलाच! शेवटचे सुप्रियाच्या तोंडचे 'साधी राख तर सांडलीय' हे वाक्य तर प्रेक्षकांच्या काळजावर चराच पाडून जाते. कथानकातील उत्कंठावर्धक कलाटण्या शिक्षण-न्यायदान क्षेत्रातला भ्रष्टाचार, तथाकथित सुशिक्षितांचा निसुगपणा सहजपणे उलगडत जातात. पहिल्याच प्रयत्नातील या यशाबद्दल मतकरींचे अभिनंदन!

**'धग'ने सांगता**

संपूर्ण देशातील चित्रपटांत सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक हा सर्वोच्च मान मराठीला प्रथमच मिळवून देणाऱ्या शिवाजी लोटण-पाटीलच्या 'धग'या चित्रपटाने महोत्सवाची सांगता झाली. तेव्हा सन्मान मूर्ती होते 'लगान'कार आशुतोष गोवारीकर श्रेष्ठ लघुपटाचा पुरस्कार मिळवणाऱ्या 'कातळ'चा तरुण दिग्दर्शक विक्रांत पवार, गजेंद्र अहिरेच्या 'अनुमती' चित्रपटाचा व्यथित नायक समरस होऊन साकारल्या बद्दल सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचा पुरस्कार (सर्वोत्कृष्ट व्यावसायिक चित्रपट 'पानसिंग तोमर'मधील भूमिकेसाठी इरफान खान सोबत विभागून) पटकावणारे ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले आणि 'धग'च्या नायिकेच्या भूमिकेबद्दल अभिनयाच्या राष्ट्रीय पुरस्काराची मानकरी ठरलेली उषा जाधव !

महोत्सवात सादर झालेले सर्वच चित्रपट पुरस्कारप्राप्त -त्यामुळे निर्मितीमूल्ये-अभिनय या दृष्टीने उत्कृष्टच होते. 'धग' हा चित्रपट 'किरवंत'या नाटकाची आठवण जागवणारा होता. तर के. गोपीनाथन दिग्दर्शित सर्वोत्कृष्ट मल्याळी चित्रपट 'इथ्र माथरम' (पत्रातला ता.क.) सतीश आळेकरांच्या 'महानिर्वाण' नाटकाची आठवण करून देणारा होता.

बाप्पादित्य बंदोपाध्याय याने दिग्दर्शिलेल्या 'हाऊसफुल'ची सुरुवात खूपच रहस्यमय, उत्कंठावर्धक वाटली पण पुढे मात्र त्याचा पटकथा लेखकाच्या त्या कथेत दहशतवादाचे सूत्रही मिसळण्याच्या प्रयत्नात चित्रपटकथेची वीण सैल झाली आणि चित्रपट इथेतिथे भरकटत राहिला!

सुमित्रा भावे, सुनील सुकथनकरांचा 'संहिता' हा चित्रपटही एका चित्रपटकर्तीचीच कथा सांगणारा अत्यंत उत्कृष्ट निर्मितीमूल्ये असलेला हाही चित्रपट थोडा असरट पसरट होऊन लांबल्यासारखे वाटले. मूळ कार्यक्रमात घोषित 'आभास' हा हिंदी चित्रपट आयत्या वेळच्या सीडीच्या तांत्रिक अडचणीमुळे संयोजकांना दाखवता आला नाही.

(त्याऐवजी गिरीश कासारवल्लीचा 'गुलाबी टॉकिज' हा सांस्कृतिक सौहार्दाला धर्मद्वेषाच्या विखारामुळे लागणारे ग्रहण हा गंभीर विषय कलात्मक तरलतेने दर्शवणारा सुरेख चित्रपट दाखवण्यात आला!) पण उपस्थित दिग्दर्शिका विजया जेना यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तेव्हा, त्यांनी मांडलेला एक विचार एक रसिक म्हणून आम्हाला खूप भावला. किंबहुना, हा महोत्सव बघताना हाच विचार आमच्या मनात सतत चुकचुकत होता. पुरस्कारप्राप्त चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोचण्यासाठी सरकारची कोणतीही योजना नाही. शताब्दीनिमित्त प्रभातच्या या चित्रमहोत्सवासारखे चित्रपट महोत्सव किमान सर्व प्रमुख शहरांतून तरी भरवण्यात सांस्कृतिक कार्य संचालनालयाने पुढाकार घ्यायला हवा. भरपूर जाहिरात करून

असे चित्रपट सह्याद्री वाहिनीवर दाखवावल्यास ते जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोचू शकतील. मुख्य म्हणजे, चित्रपट निर्मितीसाठीचे अनुदान केवळ सकस वेगळा विषय हाताळणाऱ्या चित्रपटांसाठीच देऊन उर्वरित रकमेतून प्रत्येक शहरात व तालुक्यांच्या ठिकाणी दोनशे आसन क्षमतेची मिनी-थिएटरे बांधण्यात शासनाने पुढाकार घेतला तरच, मराठी निर्माते-दिग्दर्शकांना आपले चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोचवता येऊ शकतील. कारण आंध्र प्रदेशात सतराशे तर आपल्या महाराष्ट्रात अवघी मराठीला अडीचशे चित्रपटगृहे सध्या उपलब्ध आहेत. शताब्दी निमित्त केवळ उत्सवी सोहळे करण्याऐवजी, महाराष्ट्र शासन असे दूरगामी उपक्रम जाणीवपूर्वक राबवणार का, हाच सवाल आहे..

**लेसन्स इन फारगेटींग**

प्रभातच्या या महोत्सवात प्रचंड अस्वस्थ करून गेला तो उन्नी विजयन या तमिळ दिग्दर्शकाचा 'लेसन्स इन फरगेटिंग'हा इंग्रजी चित्रपट! जे. ए. कृष्णमूर्ती (आदिल हुसेन) हा एकाकी बाप, त्याच्या सोळा-सतरा वर्षांच्या स्मृती या मुलीवर (आपल्या के.ई.एम. रुग्णालयातील अत्याचाराला परिचारिका अरुमा शानभाग प्रमाणे!) जीवनात अवस्थेत लोळागोळा होऊन पडण्याची पाळी कोणी आणली, याचा शोध तिच्या पथनाट्य सहकाऱ्यांपासून घेत-घेत जातो आणि शेवटी जे भीषण सत्य त्याच्या समोर येते, ते त्याला हतबल करून जाते आणि प्रेक्षकांना सुन्न ! स्त्रीभ्रुणहत्या निरागस मुलींवर मानवी पशूंकडून होणारे अमानुष बलात्कार यांवर चर्चासत्रांतून शाब्दिक बुडबुडे फुगवण्याऐवजी हा चित्रपट (शेवट थोडा सूचित करून!) ठिकठिकाणी दाखवला गेला तर, त्यातील..... सर्वांच्या मनांवर अधिक बिंबेल असे तीव्रतेने वाटले आणि व्यापक वितरणाची गरज पुनश्च जाणवली!

(पान २१ वर )



**आणि शताब्दी महोत्सवाला उपस्थित प्रेक्षकवृंद**



# क्लो•ज•अ•प

## हिंदी पडद्यावर 'गे'तरूण

**भारतीय** सिनेमाची शताब्दी साजरी करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या 'बॉम्बे टॉकीज'या चित्रपटाने एक नवाच पायंडा हिंदी सिनेमात पाडला आहे असे म्हणायला हरकत नाही. एक तर चित्रपटांत करण जोहर, दिवाकर बॅनर्जी, झोया अख्तर व अनुराग कश्यप या चार दिग्दर्शकांनी चार लघुपट दिग्दर्शित केले आहेत. २॥ ते ३ तास चालणारा नृत्य-गीत-प्रणय-हाणामारी यांनी खच्चून भरलेला हिंदी सिनेमाचा प्रचलित फॉर्म्युला या चित्रपटांत नाही. म्हणजे विद्यमान खूप धन देणारा फॉर्म्युला येथे नाकारण्यात आला आहे. ही समाधानाची गोष्ट आहे पण... करण जोहरच्या पहिल्याच लघुपटात एक अनिष्ट, अशिष्ट व भारतीय संस्कृतशी पूर्णत: विसंगत असा कथाभाग चित्तारण्यात आला आहे. तो म्हणजे 'गे'चे चित्रण. इंग्रजीतला 'गे' म्हणजे समलिंगी शारीरिक आकर्षण होय.

व्यावसायिक चित्रपटांना आदर्श मानणाऱ्या करण जोहरनें हा 'गे'सारखा गलीच्छ विषय चित्रपटात घ्यावा हे आश्चर्यच म्हटले पाहिजे.

या पहिल्या भागाचे नांव आहे 'अजीब है दास्ता' जुन्या चित्रपटातले हे गाजलेले गाणे रेल्वेच्या पादचारी पुलावर बसून एक १२ वर्षांची मुलगी अत्यंत गोड आवाजात गाते. आणि लोकांकडे भीक मागते.

हा सीन टाकून गेल्या शंभर वर्षात भारतीय चित्रपटातील संगीत हे लोकांचे प्रमुख आकर्षण आहे हे लेखकाला सूचित करायचे आहे. येथपर्यंत ठीक आहे.



पण मुख्य कथानकाशी हा सांधा कसा जुळवला आहे. तर नायक रणदीप हुदा आणि नायिका रानी मुखर्जी हे सुखी जोडपे. दोघेही आपल्या नोकरीत 'बिझी'असतात. कार्यालयात रानी मुखर्जीची एका तरुणाशी चांगलीच गट्टी जमते. त्याचा उसळता उत्साह तिला आवडतो. पण तो तिला स्पष्टच सांगतो मी 'गे' आहे तरीही ती त्याला जेवायला घरी बोलावते. आपल्या नवऱ्याशी ओळख करून त्या 'गे'तरुणा प्रमाणे नायिकेचा नवरा सिनेमा संगीताचा प्रेमी असतो तो त्याला त्या भिकारी मुलीचे गाणे ऐकायला घेऊन जातो.

या दोघांचे 'गे'मधे रुपांतरीत होते. 'गे'तरुण ही सारी हकीगत रानी मुखर्जीला सांगतो.

परिणाम रानी मुखर्जी नवऱ्याला सोडते. हिंदी पडद्यावर हा दाहक विषय मांडण्याचे धाडस करण जोहरनें केले एवढेच त्याला महत्त्व अन्यथा सिनेमाची भट्टी मुळीच जमलेली नाही.

**स्टार वेड**

हिंदी सिनेमाच्या प्रेक्षकांना संगीताच्या आवडीप्रमाणे स्टार बद्दल आकर्षण असते. याचा मागोवा अनुराग कश्यप यांनी आपल्या लघुपटात घेतला आहे. दूर उत्तर प्रदेशांत रहाणारा म्हातारा मरायला टेकला आहे. तेव्हा त्याला आठवते आपला बाप मरणासन्न असतांना त्याची इच्छा होती. दिलीप कुमारने त्याला आशिर्वाद देण्यासाठी तो मुलाला (म्हणजे आता मरणासन्न असणाऱ्या मुलाला) पिटाळतो. हा म्हातारा आपल्या मुलाला अमिताभ बच्चनकडे मुंबईत पिटाळतो. आणि घरात बनलेला मुरब्बा अमिताभने अर्धा खाल्ला की उरलेला अर्धा खाऊन हा म्हातारा आणखी जगेल असे त्याला वाटत असते.

अमिताभला भेटण्यात ज्या अडचणी येतात त्या म्हणजे हा लघुपट.

सामान्य माणसाला हिंदी सिनेमा हिरोचे कीती भाबडे आकर्षण असते त्याची खिल्ली उडविण्यासाठी अनुरागने हा लघुपट केला आहे. सिनेमाच्या शंभरवर्षातली आपली कमाई हीच कायती आहे. असे अनुरागला सूचित करायचे असावे पण भट्टी जमली नाही.

झोया अख्तरने आपल्या लघुपटात लहानमुलावर हिंदी सिनेमातील 'आयटम साँग'चा कसा परिणाम होतो हे बालीश पद्धतीने चितारले आहे. लघुपटाचे नाव 'शैला की जवानी' आहे.

चौथा लघुपट आहे दिबाकर बॅनर्जीचा 'स्टार' मूळ कथा सत्यजित राय यांची बंगाली आहे. पण तेथून ती उचलून दिबाकर बॅनर्जींनी मुंबईतील खुराडेवजा चाळीत मराठी लोकांत आणून बसविली आहे.

घरात अठराविश्व दारिद्र्य असलेला नवाद्दीन सिद्दीकी रंगमंचावर किंवा चित्रपटात नट बनण्याची आकांक्षा धरून असतो. त्याची बायको त्याला उत्तेजन देते. तर मुलगी सिनेमाची बेहद चाहती असते.

सिद्दीकी नीट कपडे घालून वॉचमनच्या नोकरीसाठी मुलाखत द्यायला जातो. पण तेथे गेल्यावर वॉचमन नेमला गेल्याचे त्याला कळते.

वेळ घालविण्यासाठी भटकत असतांना एके ठिकाणी रस्त्यावर चित्रपटाचे शुटींग चालले असते ते पहात गर्दीत उभा असतो. दिग्दर्शकाचे लक्ष त्याच्याकडे जाते. शुटींगच्या प्रसंगात हिरोला धक्का मारणारा एक अनोळखी चेहरा हवा असतो. दिग्दर्शक सिद्दीकीची निवड करतो.

आणि हिरोला धक्का मारण्याचा सिद्दीकीचा पहिलाच शॉट ओ.के. होते. सारे युनिट त्याचे कौतुक करते. वॉचमन त्याला थांबायला सांगून त्याचे मानधन आणायला जातो.

वॉचमन परत येइपर्यंत आपण नट झालो या आनंदात सिद्दीकी दौडत घरी जातो. आणि मुलीला सारा किस्सा वर्णन करतो.

हा लघुपट उत्तम जमला आहे. पण मध्येच त्याचा दिवंगत बाप त्याला दिसतो. सदाशीव अमरापूरकरने ही भूमिका केली आहे. बापाला मात्र मुलानें नट होऊ नये असे वाटत असते. म्हणून नाटकांत 'नटसम्राट'ची भूमिका तो मुलाला देत नाही, हा सारा 'सीन' एकदम ठिगळ लावण्यासारखा लघुपटात येतो. शिवाय तो सिद्धीकीचा बाप आहे हे प्रेक्षकांच्या लगेच लक्षात येत नाही.

हे ठिगळ असूनही चारही दिग्दर्शककात दिबाकर बॅनर्जी बाजू मारून जातो.

## ऋतुपर्णो घोषचे अकाली निधन

बंगाली चित्रपट व्यवसायात ऋतुपर्णो घोष 'तरुण सत्यजित राय' म्हणून ओळखला जायचा. त्याचे वयाच्या ४९ व्या वर्षी हृदयक्रिया बंद पडून अकस्मात निधन झाले म्हणून सारा बंगाली चित्रपट व्यवसाय हळहळला. ऋतुपर्णोनें 'हिरेर अंगुठी' हा पहिला चित्रपट लहानमुलांसाठी दिग्दर्शित केला पण तो एकदम प्रसिद्धीच्या झोतात आला त्याच्या 'उन्नीशे एप्रील' या पहिल्याच चित्रपटाला उत्कृष्ट चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाल्याने. याबाबतीत त्याचे राय यांच्याशी साम्य म्हणता येइल. सत्यजितही त्यांच्या 'पथेर पांचाली'या पहिल्याच चित्रपटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचले.

ऋतुपर्णोचा दुसरा चित्रपट 'दहन' आमच्या मुंबई महोत्सवात दाखवला गेला. 'दहन'ला सर्वोत्कृष्ट पटकथेचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. तर 'उत्सव'साठी सर्वोत्तम दिग्दर्शनाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. 'दहन'मुंबई पाठोपाठ कार्लोव्हीवारी महोत्सवात दाखवला गेला.

ऋतुपर्णोचे राय यांच्याशी आणखी एक साम्य म्हणजे त्याचे चित्रपट साहित्याच्या अंगाने जातात. 'चोखेरबाली', चित्रांगदा व नौकाडुबी हे चित्रपट टागोरांच्या कथेवर आधारीत होते.

पहिल्याच चित्रपटाला सर्वोत्तम चित्रपटाचा राष्ट्रीय सन्मान लाभल्याने ऋतुपर्णोने आपल्या चित्रपटात ऐश्वर्या राय. अनुपम खेर अजय देवगण (रेनकोट) अमिताभ बच्चन, जॅकी श्रॉफ, बिपाशा बसु, मनीषा कोइराला, शर्मिला टागोर इ. हिंदीतील बड्या कलावंतांना भूमिका दिल्या. आणि आपले कलावंतांचा दिग्दर्शक हे नांव सार्थ केले.

कांही बंगाली चित्रपटात त्याने भूमिकाही केल्या. २४ तास त्याच्या डोक्यात सिनेमाचाच विषय घोळत असायचा. त्याचा कामाचा झपाटाही जबरदस्त होता. त्यामुळेच १९९५ ते २०१३ या अठरा वर्षात त्याने १५ चित्रपट दिग्दर्शित केले. ●



# बॉम्बे टॉकीज (कलर/१३०मि.)

दिग्द : करण जोहर/दिबाकर बॅनर्जी/झोया अख्तर/अनुराग कश्यप

कलाकार : अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी, विनीत कुमार सिंज, नवाजुद्दीन, रणदीप हुदा, सकील सलीम, सदाशीव अमरापूरकर

● **संतोष पाठारे**



**सिनेमा** भारतीय प्रेक्षकाला सर्वांगाने व्यापून राहिला आहे. गेल्या शंभर वर्षात सिनेमा नावाच्या मोहजालात आपण पुरते अडकून गेलो आहोत. शतक भराच्या काळात सिनेमाने आपले रूपे बदलली तसंच भारतीय माणसाचं रोजचं जगण देखील बदललं, अधिक व्यामिश्र झालं. मात्र या बदलात सिनेमाने मोठी भूमिका बजावली आहे. किंबहुना प्रत्येक व्यक्तीच्या मनातील एक हळुवार कोपरा ........ सिनेमाने त्यातील गीत संगीताने व्यापलेला आहे. सार्वजनिक आयुष्यात देखील सिनेमाने आपली भूमिका चोख वठवली आहे. सिनेमाच्या मोहमयी दुनियेची एकदातरी सैर करावी असं ज्याला वाटलं नाही अशी व्यक्ती आजच्या जमान्यात सापडणं विरळाच! सामान्य माणसावर सिनेमाने घातलेल्या मोहिनीचं विविधरंगी चित्रण करणारा 'बॉम्बे टॉकीज' नुकताच प्रदर्शित झालाय.

करण जोहर, दिबाकर बॅनर्जी, झोया अख्तर आणि अनुराग कश्यप या आजच्या घडीला सिनेमासृष्टीत आपापल्या शैलीतले चित्रपट करून स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या दिग्दर्शकांनी निर्माण केलेले चार लघुपट बॉम्बे टॉकीज मध्ये पहायला मिळतात. भारतीय सिनेमाच्या शताब्दीच्या निमित्ताने या चार दिग्दर्शकांनी सिनेमासृष्टीला दिलेली ही मानवंदना आहे. प्रेक्षकाच्या अभिरुची प्रमाणे या चार लघुपटाचं मूल्यमापन होऊ शकते. मात्र 'भारतीय सिनेमा व चंदेरी दुनियाच भारतीय प्रेक्षकावरील प्रभाव' हे समान सूत्र या लघुपटाचं मूल्यमापन होऊ शकते मात्र 'भारतीय सिनेमा व चंदेरी दुनियेचा भारतीय प्रेक्षकावरील प्रभाव' हे समान सूत्र या लघुपटांतून गांभीर्याने मांडल गेलंय हे. या लघुपटांचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक दिग्दर्शकाने आपल्या नेहमीच्या शैलीपेक्षा अत्यंत वेगळ्या पद्धतीने या लघुपटांचं दिग्दर्शन केलंय त्यामुळेच हे लघुपट त्यातील उणीवांसहित आपल्याला भावून जातात.

बॉम्बे टॉकीज मधील पहिली कथा 'अजीब दास्ता है ये' करण जोहरने दिग्दर्शित केलीय. 'कभी खुशी कभी गम' सारखे लार्जर दॅन लाईफ सिनेमे देणाऱ्या करण जोहरचा हा लघुपट हटके आहे. गायत्री (राणी मुखर्जी) आणि देव (रणदीप हुदा) या मिडिया क्षेत्रात वावरणाऱ्या दाम्पत्याच्या आयुष्यात अविनाश (सकीब सलीम) या 'गे' युवकाच्या येण्याने आलेल वादळ करण जोहरने आपल्या

लघुपटत मांडलंय. मिडिया मध्ये वावरणारी माणसं, त्यांची मोकळी ढाकळी जीवनशैली, आपल्या सेक्स लाईफ बद्दल उघडपणे चर्चा करण्याची मानसिकता व ती अंतर्मनात दडवलेली कटू सत्य यांची तरल मांडणी करण जोहरने केली आहे. भारतीय सिनेमाच्या प्रत्यक्ष प्रभावाचा या लघुपटात संदर्भ नसला तरीही नायकांची मानसिकता टिपण्याठी 'लग जा गले' व 'अजीब दास्ताँ है ये' या लताबाईच्या दोन अजरामर गाण्याचा चपखल वापर करण जोहरने आपल्या लघुपटाने करून भारतीय सिने संगीताने प्रेक्षकांच्या भावविश्वात केलेला शिरकाव सूचकपणे व्यक्त केलाय. धाडसी विषयाची संयमित हाताळणी व प्रमुख कलावंताचा उत्कट अभिनय या पहिल्याच लघुपटात पहायला मिळतो व बॉम्बे टॉकीज चें वेगळपणं सुरवातीलाच नजरेत भरतं.

झोया अख्तर ने दिग्दर्शित केलेली 'शैला की जवानी' ही वरवर पाहता एका बारा वर्षाच्या मुलाला सिनेमातल्या नटीबद्दल वाटणारं आकर्षण व सिनेमात डान्सर बनण्याचं त्याचं स्वप्न अशी एकरेषीय कथा असली तरी त्याला अनेक कंगोरे आहेत. मुलाने फुटबॉलपटू व्हावं असं वाटणारा मध्मवर्गीय पिता या कथेत आहे. मात्र फुटबॉल ऐवजी सिनेमाचं आकर्षण वाटणारा मुलगा असूनही मुलीचे कपडे परिधान करण्याची आवड निर्माण झालेला आणि 'शैला की जवानी' सारख्या आयटम साँगवर नृत्य करू पाहणाऱ्या बारा वर्षाच्या मुलाची विचित्र मनस्थिती झोया अख्तरने आपल्या लघुपटात मांडून सिनेमाचा लौंगिकतेवर होणारा परिणाम अप्रत्यक्षरित्या अधोरेखित केलाय.

दिबाकर बॅनर्जीचा स्टार हा लघुपट सत्यजित राय यांच्या 'पतोल बाबू, फिल्म स्टार' या लघुकथेवर आधारित आहे. पुरंदर या सिनेमात करियर करू इच्छिणाऱ्या एका अयशस्वी अभिनेत्याची कथा दिबाकर ने मुंबई शहराच्या पार्श्वभूमिवर मांडली आहे. मुंबई शहराचे तपशीलवार चित्रण, नवाजुद्दीन या आजच्या 'टॉक ऑफ टाऊन' असलेल्या अभिनेत्याचा बहारदार अभिनय, सदाशिव अमरापूरकराचं एका सीनपुरताच परंतु दमदार दर्शन आणि मंबई शहरात सिनेमात करियर करू इच्छिणाऱ्या हजारो लोकांची प्रतिनिधिक व्यथा मांडणारी कथा, या जमेच्या बाजू असूनही 'स्टार' पाहताना काही गोष्टी खटकतात.

नवाजुद्दीनचं मराठी असणं त्याच्या सदोष मराठी उच्चारामुळे पटत नाही. तसच सदाशिव अमरापूरकरांबरोबरच्या प्रसंगात आलेले नटसम्राट नाटकाचे उल्लेख स्पष्ट होत नाहीत (अमराठी प्रेक्षक तर या व्यक्तिरेखेला नीटपणे समजूच शकणार नाहीत!) या उणीवा असूनही दिबाकरने 'स्टार'ची केलेली हाताळणी एक चांगला लघुपट पाहिल्याचं समाधान देते.

या तीनही गंभीर लघुपटांच्या पार्श्वभूमीवर अनुराग कश्यमचा 'मुरब्बा' या लघुपटाचा आशय काहीसा गंभीर असला तरीही त्याच्या हलक्या फुलक्या हाताळणीमुळे लक्षवेधक ठरलाय. आजारी वडिलांच्या इच्छेनुसार मुंबईत येऊन अमिताभ बच्चनला आईच्या हातचा मुरब्बा खायला लावण्याचा ध्यास घेतलेला विजय (विनित कुमार सिंग) व त्याच्या या ध्यासात आलेले अडथळे अनुराग कश्यपने छान टिपलेत. भारतीय सिनेसृष्टीत अमिताभ बच्चन यांचं असलेलं सर्वोच्च स्थान, प्रेक्षकांची बिग बी प्रती असलेलं प्रेम व त्या अनुषंगाने एकूणच सिनेसृष्टीतील स्टार्सचा सामान्य माणसावर असलेला प्रभाव 'मुरब्बा'तून नेमकेपणाने प्रकट होतो.

भारतीय चित्रपटसृष्टीच्या शंभरीच्या निमित्ताने आजच्या आघाडीच्या दिग्दर्शकांच्या नजरेतून भारतीय सिनेमा बद्दलचा जनसामान्याच्या बहुविध भावना मांडण्याचा 'बॉम्बे टॉकीज'च्या निर्मात्यांचा प्रयत्नाच स्वागत करायला हवं. या लघुपटांच्या आशयातून सिनेमा माध्ममाने नव्या शतकात पाऊल टाकल्याची नांदी केली आहे. याचीही नोंद घ्यायला हवी. ●

**पान १३ वरून**

आणि रूळाचे पडदे असत तेव्हा आडव्या पट्टीचा वापर करून हालचाली बसवलेल्या असा तालमीत घटवला जाणारा तंत्राचा भाग असे. स्थलनिर्मितीसाठी नटाच्या अभिनयाने काम साधले जाऊ शकत होते. रंगभूषा आणि प्रकाशझोत यांनी चेहरा अधिक उजळ केला जाई. तरुण पात्रासाठी ओठ आणि गालांवर रंग आणि भुवया रेखणे या अगदी किमान रंगभूषेच्या साहाय्याने म्हटले तरी पात्रांची सोंगे दृश्य पातळीवर वठवली जात. रंगभूषेची अनेक तंत्रे रंगमंचावर प्रचलित होती.

हे सारे कॅमेरा समोर आल्यानंतर बदलते. या गोष्टी कॅमेरा समोर आल्याबरोबर प्रतिमेमध्ये कृत्रिम आणि बटबटीत दिसतात. पण डोळ्यांना सवय होती. रंगमंचाच्या अनुभवात जे खेळाचे नियम म्हणून मान्य होतात त्यात कृत्रिम ते खरे मानावे अशी परस्परवहिवाट होती. कृत्रिमता चालवून घेण्याची सवय चित्रपटामधील समीपदृश्यांनी आणि त्यांच्या आकर्षकतेने लागली. चित्रपटीय प्रतिमा चकाकी म्हणजे ग्लॉस आणि चित्तकर्षक सौंदर्यप्रसाधन म्हणजे ग्लॅमर यांच्या योजनेमुळे जशी आली तशी डोळ्यांना सवयीची झाली. यापेक्षा चित्रपटीय प्रतिमा वेगळी असू शकते ती अगदी वेगळ्या प्रकारे आविष्कारक्षम असू शकते हे समजून घेण्यापेक्षा किंवा त्यातला धोका स्वीकारण्यापेक्षा पडद्यावर नाटक दाखवणे सोपे आणि यशाची खात्री देणारे ठरले. सुरवातीच्या काळात आणि काही वेळा आजही भारतीय चित्रपटात सेट हा सेट आहे हे कळते. चेहरे रंगवलेले आहेत दाढीमिशा लावलेल्या आहेत आणि वाढलेले वय दाखवण्यासाठी केसांना रंग लावलेला आहे हे कळते. म्हणजे दिसते. हा प्रसंग कॅमेरा टिपणार म्हणून घडवला हे कळते. माणसांच्या आयुष्यातील एक तुकडा आपण जसा घडला तसा पाहतो आहोत हा अनुभव येण्याऐवजी हे लोक काही ना काही सोंगे घेऊन खेळ करून दाखवत आहे. असाच म्हणजे नाटकासारखाच अनुभव तयार होतो. परंतु त्यात नाटकाचे जिवंत प्रयोगाच्या सादप्रतिसादाचे स्वत्वही नसते आणि सिनेमाची मागणी तर बाजूला पडलेली असतेच. चारपाच पात्रे असली तर ती रंगमंचावर अर्धवर्तुळात उभी असावीत तशी उभी राहून भाषणे बोलतात. सर्वजण चित्रचौकटीत येतील अशा अंतरावर कॅमेरा असतो आणि मग थोडा जवळ लांब जातो. पात्रे डावीउजवीकडून प्रवेश करतात. एकमेकांशी बोलणारी दोन माणसे एका चौकटीत दोघेही कॅमेरा समोर येइल असे बोलतात. ज्याला 'टु शॉट' म्हणतात तशा अनेकानेक चौकटी प्रत्येकाला आठवतील. याला प्रतिसाद देताना कृत्रिम दृश्यांचा सांकेतिक अर्थ लावणारा आणि केवळ हुबेहूब छबी दिसल्याच्या वैशिष्ट्याला धरून प्रेक्षक जात होता. ती छबी चित्ताकर्षक आणि झळाळीची होती.

चित्रपटमाध्यमाची मागणी वास्तवाची असते. ते निर्मित वास्तव असले तरी त्याची रचना विशिष्ट स्थलकालाच्या दर्शक मूर्त अशा तपशिलांची असावी लागते. ललितविश्वाची निर्मिती करताना जो भौतिक परिसर उभा केलेला असेल त्याचा संबंध ललितविश्वाने मानलेल्या स्थळकाळाशी असावा लागतो. नाट्यमय असलेच पाहिजे असे बंधन चित्रपटावर नसते. तरीही रंजनाच्या सवयीत नाट्यमयतेला अग्रस्थान असल्याचा फायदा घेणे चित्रपटांनी पसंत केले. चित्रपटांच्या शैली बनल्यानंतर या वैशिष्ट्याला वाकवणारी अनेक तंत्रे बनली.

नाट्यमय कथांची नाट्यमयता दृश्यात्म करण्याइतकेच महत्त्व बोलपटांमधे संवादांनाही आले. त्यासाठीही नाटकातली भाषा पुढे आलीच. सिनेमात शब्द आला तो आपल्याकडे कानामागून आला आणि तिखट झाला. शिवाय बोधपरतेकडे

कल असणारे कलावंत सिनेमात ‘घेण्यासारखे’ काही असले पाहिजे असे मानत होते आणि ते शब्दातून ठासून सांगत होते. खरे तर सिनेमात लोकांना घेण्यासारख्या कितीतरी गोष्टी दिसत होत्या. पोषाखाच्या तऱ्हा, ऐटदार वावरण्याच्या पद्धती, शब्द फेकण्याच्या प्रकाराचे प्रभावी अविष्कार, हावभावांच्या लकबी... सारेच घेण्याकडे कल होता. त्यामुळे शब्दातून काही का सांगितले जाई ना या इतर गोष्टी शब्दांच्या अलिकडेच मनात घर करत होत्या. परदेशी चित्रपटांमधून साहेबी कळाशी अवगत होत होत्या. सिनेमाने सार्वजनिक पातळीवर आणलेला आणि सर्वांचा मर्मविषय म्हणजे रोमान्स. प्रेमात पडणे आणि प्रेमिकांचे प्रणयव्यवहार याची उदाहरणे सतत समोर येत होती. कौटुंबिक संदर्भातील वागण्याच्या रीतीही दिसत होत्या. प्रणयाचे तपशील कथासंदर्भ सोडून स्वतंत्रपणे ठसत होते. ही या बाबतीतली एक मजेची गोष्ट म्हणावी लागेल. उघडपणे प्रणयी व्यवहार चार जणांना दिसेल असा सुरू व्हायला जरी बराच काळ जावा लागला तरी एकुणात सिनेमा प्रणयदृश्यांच्याबाबतीत ‘प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट’ अशाच बाजाचा राहिला आहे. वर म्हटलेल्या ‘मागणी’च्या संदर्भात प्रणयमाहात्म्य खूपच आहे. ‘डोळ्यात वाच माझ्या’.. असा विभ्रम असो की ‘खुल्लम खुल्ला प्यार करेंगे’.. असा मुक्त संचार असो या भावभावनांचे उद्दीपक दृश्य रूप कसे आणि किती आणायचे यावर सामाजिक आणि सौंदर्य मूल्यांत्मक मानदंड होते. कला पेश करण्याच्या वेगवेगळ्या ‘कोटि’त्याचा वापर वेगवेगळा करत. पण सिनेमा बघायला सगळेच आले. हा फरक सांस्कृतिक मानदंडाच्या चिरेबंदी रचनेला हलवणारा ठरला. नटनटीच्या तालमी घेणे आणि कॅमेरा लावून चित्रण करणे हा सर्वसाधारण स्टुडिओमधल्या निर्मितीचा क्रम होता. करायचे नाटकच पण प्रेक्षकविना कॅमेऱ्यासमोर एकीकडे रंगमंचावर नटनटी वास्तव, नैसर्गिक अभिनय करण्याचा आणि सूक्ष्मतर आविष्काराचा प्रवास करत असताना सिनेमात मात्र नाटकीपणा टिकून होता. मराठीपुरते बोलायचे तर या दशकाच्या सुरवातीसच. नाट्यमन्वंतर ही संस्था मराठी नाट्यक्षेत्रात आधुनिक नाटकाच्या दिशेने प्रवास करू लागली ती नाटक अधिक वास्तव आणि नैसर्गिक व्हावे या दिशेने पण सिनेमाला ध्वनी मिळताच नाटकी भाषेचे चतुर नियोजन सुरू झाले.

आंतरराष्ट्रीय पातळीचा विचार केला तर आधीच्या दशकातच चित्रपटाची वेगळी भाषा जाणीवपूर्वक निर्माण होत होती. त्यातही नाट्यमयतेला स्थान होतंच पण चित्रण माध्यमाच्या गरजेनुसार केलेलं होतं. ‘बॅटलशिप पोटेन्किन’यासारखे चित्रपट गाजले होते. त्यात अगदी वृत्तचित्र म्हणावं असंही चित्रण होतं आणि एडिटिंगच्या करामतीने नाट्यमयता कशी आणता येते हेही उदाहरण पुढे आलं होतं. पण कलेचे प्रयोजन सत्यदर्शन किंवा परतत्त्वस्पर्श यापेक्षा रंजन आणि फारतर बोध असाच समज भारतीय चित्रपटात व्यक्त झालेला दिसतो. चमत्कार आणि नमस्कार अशी चालत आलेली रीतीच पुढे जात होती. ‘प्रभात’च्या तुकाराम सिनेमात सदेह वैकुंठगमन प्रत्यक्ष केल्यावर विष्णूभगवान आणि तुकाराम यांची भाबडी वंदनीयता नाट्यमय पद्धतीने नीटच ठसते. फाळके यांच्या पौराणिक कथांमधे येणारे अद्‌भुत आणि अशा ऐतिहासिक दंतकथांना दिलेले दृश्यरूप यांचा व्यापारी उपयोग तोच पण कथनातील सिनेमाची वेगळी अर्थवत्ता मात्र धूसर असे काहीसे झाले.

एका प्रकारे चित्रपटक्षेत्रात पैसा खेळवण्याचा उद्योग जरी भारतात मूळ धरू लागला तरी जागतिक माध्यम म्हणून उरलेल्या जगातील विचारप्रवाहांशी भारतीय सिनेमाचा जिवंत संपर्क नव्हता. ज्याला जसे जमेल तसे परदेशात जाऊन बघून येणे आणि

इथल्या लोकांना नवनवे अनुभव देत राहणे यातून इथल्या रंजनाची हमी घेणारा एक मार्ग जसा नाटकाश्रयी होण्याचा तसाच दुसरा मार्ग विविध मनोरंजन कार्यक्रमाचा. हाही पुढे 'मसाला'फिल्म म्हणून स्थिरावला. या दशकात अमेरिकेत किंवा फ्रान्स आणि अन्य युरोपीय देशात जे प्रयोग चालू होते त्याचा पत्ता इथल्या नवतरूण उत्साही वर्गाला नव्हता. निर्मितीच्या उद्योगात पडलेल्या कलावंतांना किंवा प्रेक्षकांनाही एकतर प्रायोगिक चित्रपट वितरणाच्या बाजारात बघायला मिळणे दुरापास्त होते. आणि आजही समोर उदाहरण आले तरी आपले चित्रपटकर्ते त्याचे सत्त्व उचलू शकत नाहीत. हे माजिद मजिदीच्या 'चिल्ड्रेन ऑफ हेवन'चे हिंदीत काय झाले यावरून समजून येते. पडद्यावरचे नाटक करणारांना बालविश्व रंगवण्यापेक्षा संघर्षावरच लक्ष केंद्रित करावेसे वाटले आणि तेही बॉलिवुडी पद्धतीने. त्याचे आणखी एक कारण म्हणजे या काळात नवसमाजनिर्मितीच्या प्रेरणांनी धडपडणारे तरूण स्वतंत्रतेच्या लढ्यात भाग घेऊन प्रत्यक्ष काही करण्याच्या कल्पनांनी आकर्षित झाले होते. प्रतिमांची निर्मिती आणि त्यासाठीचे तंत्रज्ञान बहुतेकांच्या आटोक्यातही नव्हते. साधा बॉक्स कॅमेरा हाताळता येणे किंवा हातात घेऊन बघायला मिळणे हेही दुष्करच होते. नोंद करून ठेवण्याचे महत्त्व जाणवण्यापेक्षा माझी छबी कशी दिसते या आकर्षणाचा पगडा जास्त होता. त्यामुळे झालेल्या घटनांची रीतसर नोंद करताना महत्त्वाची कामे करणारे लोकही फोटोमार्फत ठेवण्यापेक्षा लेखी स्वरूपात ठेवणे पसंत करत असत हा इतिहास आहे. सिनेमात कॅमेऱ्यासमोर येणे म्हणजे सर्वांच्या नजरेस पडणे. फोटो काढून घेण्याचा नकार मिळण्यात या शालीनतेच्या कल्पनांचा वाटा होता. पण फोटो बघताना कोण कसे 'दिसते' याची चर्चा आणि सगळे फोटोत छान नाही दिसत हे 'ज्ञान' हळूहळू होत होते.

यात एक प्रवाह जाताजाता नोंदवण्यासारखा आहे. 'लाल, बाल आणि पाल'या त्रिमूर्तींच्या टिळकयुगात झालेला एकत्रित परिणाम राजकारणात गांधीयुग आल्यानंतर अधिक देशी वळणाचा झाला. बिपिनचंद पाल यांचा मुलगा निरंजन पाल जेव्हा सिनेमाच्या क्षेत्रात गेला तेव्हा त्यांनी मूकपटांच्या जमान्यात हिमांशु रॉय यांच्यासोबत काम केले आणि लाइट ऑफ एशिया या आर्नोलच्या कथाकाव्यावरून बुद्धाच्या जीवनावरची पटकथा तयार केली. पुढे कथाविषयांमधे सामाजिक प्रश्नांचा आशय असलेल्या कथा त्यांनी चित्रपटांसाठी लिहिल्या. परंतु बोलपटांमधे भारतात काम करताना लाइट ऑफ एशियाच्या वेळी मूकपटात जो चित्रपटभाषेचा विचार होता तो मागे जाऊन नाटकप्रधान लेखन आणि चित्रणच समोर आले. सावरकर किंवा मदनलाल धिंग्रा यांच्या जहाल विचारांचा किंवा वडिलांच्या नेमस्त विचारसरणीचा प्रतिमांच्या भाषेतील अविष्कार येथील लोकप्रिय सिनेमाचे जे रसायन बनत होते त्यातच कधीकधी शब्दात उठून दिसेल इतपतच राहिला. विचाराच्या दृष्टीने मुंबईत बॉम्बे टॉकीज काढताना प्रेरणा स्पर्धात्मकच होती. चित्रपटातील नाट्यमयता आणि शब्दाचे स्थान याविषयी पुढच्या काळात उदाहरणे समोर येत गेली. काही नाटकांची किंवा कथांची रूपांतरेही कमी अधिक यशस्वी झाली. कुरोसावाने केलेले मॅक्बेथ नाटकाचे सिनेरुपांतर 'थ्रोन ऑफ ब्लड' किंवा त्रुफोच्या 'फोर हंड्रेड ब्लोज' सारखी उदाहरणे इथे घडावीत याला मुख्य धारेतील पडद्यावरच्या नाटकाने नेहमीच पायबंद घातला.

कुंदनलाल सैगल या बोलपटाच्या पहिल्या सुपरस्टारचा अफाट गाजलेला सिनेमा म्हणजे देवदास. 'पहिले प्रेम हेच खरे प्रेम' खरे प्रेम असफल असले तरी निरपेक्ष असते, 'समाज

प्रेमिकांचा शत्रू', माणसाला प्रेमापुढे आणि व्यसनामुळे येणारी हतबलता आणि त्यातून येणारी व्यक्तिगत आयुष्याची शोकांतिका इत्यादि सूत्रे या कथेला पायाभूत आहेत. मुख्य पात्रे म्हणजे देवदास, त्याची लहानपणापासूनची मैत्रिण आणि वयात आल्यानंतरची पहिली प्रेमिका म्हणजे पार्वती ऊर्फ पारो, आणि त्याच्यावर नि:सीम प्रेम करणारी कलकत्यातील नायकीण चंद्रमुखी. हा असफल प्रेमाचा प्रेमत्रिकोण यांचे संविधानक ही शोकांतिका सांगत जाते. यापैकी कुणाचेच प्रेम सफल का होत नाही तर देवदास वडलांची आज्ञा मोडू शकत नाही, पार्वती वडलांनी ठरवलेल्या विवाहाला नकार देऊ शकत नाही, देवदासचे वडील पारोला का स्वीकारत नाहीत तर ते श्रीमंत आहेत आणि पारो गरीब घरातली आहे, अशी ही बांधणी आहे. ही बांधणी पाहिली तर कथनप्रवाह, त्यातील हतबल करणारे घटक, त्यातील रंजक गाण्यांची जागा आणि चित्रीकरणातील वैशिष्ट्ये, यातून रंजन आणि गंभीर कथा कशी उलगडत जाते हे दिसून येईल. मूक आणि सोशिक भारतीय नारी पारोच्या पात्रात, हळवा असहाय नायक देवदासच्या पात्रात, आणि खरे प्रेम किती त्यागी असते हे दाखवणारी चंद्रमुखी. कारण तिचे प्रेम सफल होणे शक्यच नाही हे सामाजिक अंतराने गृहीतच दिले आहे. यात कृतिशील असणारे देवदासचे वडील, समाजात प्रतिष्ठित माणसांना रीत मोडता येत नाही हे ठरवतात. अशा घटकांना प्रसंगांमधे कसे वागायचे याचे निश्चित मार्ग आपोआप बनतात मग कथानक पुढे नेण्यासाठी येणारे प्रसंग निवडणे सोपे होते. आणि डोळे पुसत घरी जाणारा प्रेक्षक बहुधा स्वत:च्या असफल प्रेमाची एखादी आठवण कुरवाळत घरी जातो. विषम आर्थिक परिस्थितीत प्रेमिक, त्यांच्यात अडथळा आणि भौतिक अंतर, मग निराशेपोटी लागलेले व्यसन, वाढत गेलेली व्यसनाधीनता आणि पारोच्या प्रयत्नानंतरही अंत ही नाट्यमय रचना अधिक रोचक करणारे अन्य घटकही या मांडणीत आहेत.

हे दर्शन लोकप्रिय होते. ते कशामुळे? असा प्रश्न कोणी विचारला तर आम माणसाला स्वत:च्या पारंपारिक धारणाच कशा बरोबर आहेत - म्हणजे वास्तवात जरी सामाजिक बदलाचा रेटा ताण निर्माण करत असला तरी - त्या धारणांनाच धरून राहण्याची कल्पना सुखावते. देवदासच्या मृत्यूने ताणाचा निरास केल्यावर माणूस दैवगतीपुढे हतबल असतो ही आणखी एक खूप बळकट धारण पुन्हा एकवार स्थिरावते.

चुकामूक, अपघाताने बोलणे कानावर पडणे किंवा मुद्दाम चोरून ऐकणे, आयत्या वेळी कुणीतरी उपस्थित होऊन कथानकाला इष्ट कलाटणी देणे अशा नाटकी क्लृप्त्या तर कितीतरी आठवतील. अगदी बोलीभाषेत सुद्दा 'मग ष्टोरीत काय पंच मारलाय'... असं वर्णन येऊ शकतं. हा नाट्यमय 'पंच' अगदी गुद्दा घातल्यासारखा वाटला तरी तो 'लोक पसंत करतात' हेच तर गंमतीचं आहे.

●


प्रभात चित्र मंडळाचे मासिक वास्तव रूपवाणी

**वार्षिक वर्गणी १००रु.**
**प्रभात सदस्य वा.व. ५० रु.**
**अन्य फिल्म सोसायटी**
**सदस्य वा.व. ७५ रु.**
**पाच वर्षांची ४००रु.**

वर्गणी **प्रभात चित्र मंडळ** या नावे मनी ऑर्डर अथवा डीडीने पाठवावी. बाहेरील गावचे चेक स्वीकारले जाणार नाहीत.

**प्रभात चित्र मंडळ :** शारदा सिनेमा, पहिला मजला, दादर, मुंबई-४०००१४.

# प्रेक्षकांची अभिरुची आणि प्रसार माध्यमाची जबाबदारी

●दिलीप ठाकूर

**चित्रपटाची** गुणवत्ता वाढवण्याचा एक महत्त्वाचा मार्ग प्रेक्षकांची अभिरूची वाढवण्यातून जातो, त्यात 'प्रसार माध्यमा'ची भूमिका व जबाबदारी अधिकच महत्त्वाची आहे....

आज मराठी व हिंदी चित्रपटात काही प्रमाणात 'वेगळ्या वाटा' दिसतात ठोकळेबाज-फॉर्म्युलाबाज चौकटीतून बाहेर पडण्याचे काही प्रयत्न होत आहेत. चित्रपट हे फक्त दोन घटका 'पैसा वसूल' मनोरंजन करण्याचे 'माध्यम' नव्हे तर बौद्धिक भूकदेखिल भागवते, समाज व जीवनाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोनही देते असा विचार करून काही 'कलाकृती' आकार घेत आहेत. अशा प्रयत्नवादी सिनेमावाल्यानी डोक्यात हवा भरून घेवून कॅमेरा तंत्राची भाषा करू नये असे म्हणून त्यांना नामोहरम का करावे?

असो. अशा कथाप्रधान-कसदार चित्रपटाचा आस्वाद कसा घ्यायचा यासाठीचा प्रेक्षक घडवणे व वाढवणे याची जबाबदारी प्रसार माध्यमावर जरा जास्तच आहे. कारण चित्रपट व प्रेक्षक यातील महत्त्वाचा दुवा प्रसार माध्यम आहे. नियतकालिकांच्या जोडीला अमर्याद उपग्रह वाहिन्या व वेबसाईट आहेत. संख्येच्या स्वरूपात प्रसार माध्यम प्रचंड वाढले. पण विश्वासनीयता व प्रभाव याचा विचार करता काय दिसते? चित्रपटाबाबत तरी प्रसार माध्यमे जणू प्रसिद्धी माध्यमे झाली असल्याचे वातावरण आहे. बऱ्याचशा सिनेमावाल्यांना या प्रसार माध्यमाकडून आपल्या आगामी चित्रपटाची 'जोरशोरसे' गोडगुलाबी पूर्वप्रसिद्धी, व्यक्तिगत इमेजसंदर्भातील मजकूर, स्तुतीपूर्ण समिक्षा व आत्मस्तुतीच्या मुलाखती यांची अपेक्षा असते. दुर्दैवाने असे काही करणे म्हणजेच सिनेमा पत्रकारिता असे बरेच सिनेपत्रकार (व काही संपादक देखिल?) मानतात. सिनेपत्रकारीता अजिबात गंभीरतेने घेवू नये असे काही वरिष्ठच समजवतात अथवा शिकवतात. काही वृत्तपत्रे तर सिनेमाच्या जाहिराती आणणाऱ्यालाच सिनेमाचे सदर देतात. अशाने किमान टिकेचा हक्क तरी कसा राहिल? एक संपादक तर नट-नट्यांच्या भानगडी लिहीरे, वाचकांना तेच आवडते असे प्रेमाने सांगतात. गॉसिपिंग, पार्टी कव्हरेज व सिनेमावाल्यांची यथेच्छ टवाळी अशा सवंग मजकूरांची सिनेपत्रकारितेत चलती आहे. उपग्रह वाहिन्यांवरील फिल्मी मुलाखती म्हणजे चित्रपटाची एकतर्फी जाहिरात खात्री असते. दुर्दैवाने तेथे गोडी गुलाबी प्रश्‍न करणारा चांगला मुलाखतकार म्हणून ओळखला जातो.

दिवसें...दिवस सिनेपत्रकारिता म्हणजे सिनेमावाल्यांची फक्त नळी उचलणे, त्यांच्या हिताच्या बातम्या प्रसिद्ध करणे हेच झाले आहे.

अशा स्तुतीच्या वलयात रमणाऱ्या सिनेमावाल्यांना एकादा तिरकस प्रश्न, जराशी टीका, थोडासा स्पष्ट वक्तेपणा झोंबतो. असे करणाऱ्या पत्रकाराला काही येत नाही असा काही सिनेमा वाल्यांचा समज आहे. अरेरे.

प्रसार माध्यमाचा चित्रपटसृष्टीवर वचक हवा (धाक नसला तरी चालेल) कोणतीही टीका

एखाद्याला संपवण्यासाठी नसते, तर सुधारण्यासाठी असते. मराठी वाचक कायम चांगली समिक्षा व योग्य टीका यांचे स्वागत करतो, अगदी मुलाखतीतही एखाद्या कलाकाराचे विचार वाचायला आवडतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मराठी वाचकाला लेख जास्त आवडतात, त्यातील मताशी तो स्वत:ची मते पडताळून पाहतो. नवे बदलते प्रवाह चित्रपटाचे विषय, त्याचे सामाजिक परिणाम, निर्मितीमागची प्रेरणा अशा अनेक गोष्टींची चिकित्सा करणारे, शोध घेणारे, भाष्य करणारे लेखच मराठी वाचकारा बौद्धिक खाद्य देतात. या साऱ्याच्या सरमिसळीतून हा वाचक 'प्रेक्षक' म्हणून घडत जातो, त्यातून त्याची अभिरुची घडते व ते कसदार चित्रपटाच्या पत्थ्यावर पडणारे आहे.

प्रसार माध्यमाचे प्रेक्षकाचे मार्गदर्शक व मित्र व्हावे, सध्याचे वातावरण प्रसार माध्यमे चित्रपट सृष्टीची खोटी तारीफ करतात असे आहे. व ती कौतुकगाथा म्हणजेच सिनेपत्रकारिता असे दोन्ही बाजूला वातावरण आहे. हे घातक आहे.

एकीकडे चित्रपट बदलण्याची प्रक्रिया आकार घेत असताना प्रसार माध्यमाना अशा चित्रपटाकडे पाहण्याची प्रेक्षकांची दृष्टी व समाज विकसित करण्याची जबाबदारी पेलावी लागेल. 'प्रेक्षकांची अभिरूची उंचावली तर चित्रपटाचा दर्जा आणखी सुधारेल. तूर्त तरी याबाबत प्रसार माध्यमे फारसं काही करताना दिसत नाहीत. ते जास्तच चिंताजनक आहे. ●

पान ८ वरून

**मौलिक माहितीपट**

आधी म्हटले आहे त्याप्रमाणे, या महोत्सवात दाखवले गेलेले सात-आठ कलाकार-तंत्रज्ञ यांच्यावरील माहितीपट हे त्याचे एक मौलिक आकर्षण होते. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या उभारणीपासून त्या वास्तूशी अतूटपणे जोडले गेलेले माजी संचालक पी. के. नायर यांच्या, नव्या-जुन्या चित्रपटफिती मायेने जतन करण्याच्या ध्यासाचा वेध घेणारा शिवेन्द्रसिंग डुंगरपूर यांचा 'द सेल्युलॉइड मॅन' पावणेतीन तासांचा माहितीपट, चित्रपट कलेविषयीची आपल्या समाजातील अनास्थेवर प्रखर झोत टाकणारा होता. (फक्त त्या चित्रपटात पी. के. नायरनी, दादासाहेब फाळके यांच्या 'राजा हरिश्चंद्र'या पहिल्या चित्रपटाची रीळे, फाळके शताब्दी प्रथम साजरी करणाऱ्या प्रभात चित्र मंडळाच्या सुधीर नांदगावकरांमुळे आपण मिळवू शकलो, याची कबुली प्रामाणिकपणे द्यायला हरकत नव्हती असे मनात येत राहिले!

**व्ही. बाबासाहेब**

'पतिता' 'सीमा', 'गंगा जमुना'यासारख्या शेकडो चित्रपटांचे नेत्रसुखद छायाचित्रण कल्पकतेने करणारे व्ही. बाबासाहेब आजही वयाच्या ९६व्या वर्षी मिरजेत उपेक्षिताचे जिणे जगत आाहेत. त्यांच्यावर भरत कान्हेरे व अविनाश देशपांडे यांनी केलेल्या माहितीपटामुळे, ही चित्रपटसृष्टी केवळ बेगडी ग्लॅमरच्या भोवतीच कशी रुंजी घालते, हे पुन्हा एकदा मनावर ठसले. राज कपूर, अशोक कुमार, आर. डी. बर्मन, स्मिता पाटील, मोहम्मद रफी यांच्या कारकीर्दीचा आढावा घेणारे हे सर्वच माहितीपट प्रेक्षणीय होते.

त्या माहितीपटांपैकी श्रेष्ठ दिग्दर्शक एन.एफ.डी.सी.चे माजी अध्यक्ष हृषिकेश मुखर्जी यांनी सेन्सॉरशिपच्या संदर्भात व्यक्त केलेले विचार मनात घोळत राहिले. अभिव्यक्तीस्वातंत्र्य प्रिय असलेल्या हृषिदांनी त्या मुलाखतीत भारतीय चित्रपटांवरील सेन्सॉरशिपचे जोरदार समर्थन केले होते. ●

# प रि क्र मा

## मुंबई विद्यापीठात 'फिल्म स्टडीज' कोर्स सुरू होत आहे

मुंबई विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातर्फे एम.ए. ला 'फिल्म स्टडीज'कोर्स चा अभ्यासक्रम येत्या जुलैपासून सुरू होत आहे. ग्रॅज्युएट झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला या कोर्ससाठी जाता येइल.

## आता एक चित्रपट अकरा दिग्दर्शक

'बॉम्बे टॉकीज' चार दिग्दर्शकांनी वेगळी कथानके घेऊन दिग्दर्शित केला पण आता 'एक्स' हा चित्रपट अकरा दिग्दर्शक दिग्दर्शित करणारा आहे. नट-दिग्दर्शक रजत कपूरची यांत प्रमुख भूमिका आहे. 'एक्स' ही एका चित्रपट दिग्दर्शकाची कथा आहे. त्याच्या फिल्म करीयर मधे आलेल्या दहा गर्लफ्रेंडची ही कथा आहे.

चित्रपटाचे हे अकरा दिग्दर्शक म्हणजे अभिनव तिवारी, प्रतीम डी. गुप्ता, क्यू, राजा सेन, राजश्री ओझा, संदीप मोहन, सुडीश कामत, सुवर्ण वर्मा आणि थंगराजन कामराज.

निर्माता आहे मनीश मुंदडा. चित्रपटाचे शुटींग सुरू झाले आहे.

## ऋत्विक घटक यांच्यावर बंगाली चित्रपट

सत्यजित राय, ऋत्विक घटक आणि मृणाल सेन यांनी पन्नासच्या दशकात बंगाली सिनेमाला नवा आशय दिला ऋत्विक घटक यांचा 'नागरिक' हा चित्रपट १९५२ सालचा पण तो प्रकाशीतच झाला नाही. त्यामुळे सत्यजित राय यांच्या 'पथेर पांचाली' (१९५५) चित्रपटाकडे त्या आशयाचे नेतृत्व गेले. त्यानंतर 'मेघे ढाके तारा', 'अजांत्रिक', 'सुवर्णरेखा' इ. एकापेक्षा एक सरस चित्रपट काढून ऋत्विक घटक यांनी दिग्दर्शक म्हणून आपले स्थान पक्के केले. दारूच्या व्यसनापायी ऋत्विक घटक यांचा मृत्यू ओढवला.

कमलोवर मुखर्जी यांनी 'मेघे ढाका तारा' याच नांवाचा बंगाली चित्रपट ऋत्विकदांच्या जीवनावर बनवला आहे. चित्रपटातले ऋत्विक घटक यांचे नांव नीलकान्त बागची आहे. आणि शाश्वत चटर्जीने ती भूमिका केली आहे. चित्रपटात साठच्या दशकातले सत्यजित राय, मृणाल सेन, उत्पल दत्त, अनिल चटर्जी काली बॅनर्जी असे अनेक नामवंत पडद्यावर येतात. त्यांच्या भूमिका इतर नटांनी केल्या आहेत.

जून अखेरीला 'मेघे ढाके तारा' प्रकाशीत होत आहे.

## आशुतोष गोवारीकर छोट्या पडद्याकडे



लगान, जोधा अकबर या सारखे यशस्वी चित्रपट केल्यानंतर आशुतोष गोवारीकर आता झी टीव्ही साठी 'गौतम बुद्ध' ही ५२ भागांची सीरीयल करत आहे. नुकत्याच या सीरीयलचा मुहूर्त झाला. बुद्धाची भूमिका कोण करणार आहे हे गोवारीकरांनी गुलदस्त्यात ठेवले आहे. पण कबीर बेदी एका महंताच्या भूमिकेत आहे. मालीका बी.के. मोदी हे कारखानदारनि करत आहेत.




**किरण शांताराम व मृणाल सेन**

## कलकत्ता फेडरेशनचा सिने शताब्दी महोत्सव

फेडरेशनच्या कलकत्ता शाखेने 'नंदन'च्या सहकार्याने ७ चित्रपटांचा सिनेशताब्दी महोत्सव ५ जून ते १० जून या सप्ताहांत आयोजित केला. महोत्सवाचे उद्घाटन अखिल भारतीय फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीचे अध्यक्ष किरण शांताराम यांनी केले. उद्घाटन सोहळ्यात माधवी मुखर्जी, तरुम मुजुमदार, सौमित्र चटर्जी इ. ज्येष्ठ कलावंतांचा सत्कार करण्यात आला.

मृणाल सेन ९२ वर्षांचे असल्यामुळे सत्कार समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत. म्हणून किरण शांताराम यांनी त्यांच्या घरी जाऊन त्यांना ट्रॉफी प्रदान केली.

## चित्रपट कृष्णधवल डीव्हीडी रंगीत

अल्ट्रा डिस्ट्रीब्यूटर्स नी 'चोरी चोरी' (राजकपूर-नर्गिस) हाफ टिकेट (मधुबाला किशोर कुमार) आणि 'दिल तेरा दिवाना (शम्मी कपूर-माला सिन्हा) या कृष्णधवल चित्रपटांच्या रंगीत डीव्हीडी प्रकाशीत केल्या आहेत. हे चित्रपट डिजिटल पद्धतीने रिस्टोअर करून ते रंगीत करण्यात आले.

संपादक : **सुधीर नांदगांवकर,** मुखपृष्ठ/मांडणी/व्यंगचित्र:**रघुवीर कुल**
मुद्रक,प्रकाशक:**संदीप मांजरेकर** छपाई :**रचनामुद्रण**,दादर,मुंबई-१४. Email : cinesudhir@gmail.com
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**Vastav Roopwani** (Monthly) **June 2013** MH/MR/EAST/82/2012-14
20th year of Publication RNI No.59908/94

प्रति,

प्रेषक : **वास्तव रूपवाणी** प्रभात चित्र मंडळ, शारदा सिनेमा, दादर, मुंबई-४०००१४.

## लाल बहादूर शास्त्रीवर
## ‘जय जवान जय किसान’

व्हिक्टोरियल एंटरप्रायझेस तर्फे भारताचे द्वितीय पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनावर ‘जय जवान जय किसान’ हा चित्रपट निर्माण करत आहे. मिलन अजमेरा ती दिग्दर्शित करता आहे. डॉ. राजेंद्र प्रसादांच्या भूमिकेत ओमपुरी असेल.



### प्रभात : जून महिन्याचे कार्यक्रम

| | |
|---|---|
| १९ जून (बुध) | **लव्ह कॉन्कर्स ऑल** (मलेशिया/२००६/९०मि.) दिग्द. तान चुई मुई |
| २६ जून (बुध) | **इट गेट्स बेटर** (थाई/२०१२/१२०मि.) दिग्द. तनवरीन सुख्खापिस्त |

**रंगस्वर, चव्हाण सेंटर सायं. ६.३०वा.**

| | |
|---|---|
| २० जून (गुरू) | **बारीवाली** (बंगाली/२०००/१०१मि.) दिग्द. ऋतुपर्णा घोष |
| २१ जून (शुक्र) | **तितली** (बंगाली/२००२/१०१मि.) दिग्द. ऋतुपर्णा घोष |

**दादर माटुंगा कल्चरल सेंटर**
**सायं. ६.३० वा.**

## फायनल कट

**रघुवीर कुल**

**प्रभात चित्र मंडळ आयोजित**
**सिनेशताब्दी महोत्सव**

